Maharashtra State
Board of Secondary & Higher Secondary Education,
Nashik Divisional Board,
Servey No.1560/1, Adgaon Shivar,
Near New English School Adgaon,
Nashik-422 003.

महाराष्ट्र राज्य
माध्यमिक व उच्च माध्यमिक
शिक्षण मंडळ,नाशिक विभागीय
मंडळ,सर्व्हे नं.१५६०/१,
आडगांव शिवार,न्यु इंग्लिश स्कुल
आडगांवजवळ,नाशिक–४२२००३.

दूरध्वनी क्रमांक 0253- 2950410,2945241,2945251 Email-nsksec@rediffmail.com

महत्वाचे

क्र.नाविमं/माध्य.ब-१/ 5739
नाशिक ४२२००३
दि.२०/१२/२०२२

प्रति,
मुख्याध्यापक,
मंडळ कार्यालयाच्या कार्यकक्षेतील
सर्व मान्यता प्राप्त शाळा,
नाशिक/धुळे/जळगाव/नंदुरबार

विषय – माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षा मार्च २०२३ च्या शास्त्रीय कला, चित्रकला क्षेत्रात प्राविण्य मिळविणाऱ्या व लोककला प्रकारात सहभागी होणाऱ्या विद्यार्थ्यांना सवलतीचे अतिरिक्त गुण देण्याबाबतच्या प्रस्तावाबाबत..

संदर्भ – शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०१६/प्र.क्र./१९५/१६/एस.डी.-६ दि.२४/११/२०१७

उपरोक्त संदर्भीय शासन निर्णयास अनुसरून कळविण्यात येते कि, शास्त्रीय कला, चित्रकला क्षेत्रात प्राविण्य मिळविणाऱ्या व लोककला प्रकारात सहभागी होणाऱ्या विद्यार्थ्यांना सवलतीचे अतिरिक्त गुण देण्याबाबत सुधारित कार्यपद्धती शासनाने निर्गमित केलेली आहे.

सन २०१९ पासून शास्त्रीय कला, चित्रकला (एलिमेंटरी व इंटरमिजीयेट दोन्ही परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक) क्षेत्रात प्राविण्य मिळविणाऱ्या व लोककला प्रकारात सहभागी होणाऱ्या विद्यार्थ्यांनाच माध्यमिक शालान्त परीक्षेमध्ये अतिरिक्त गुणांची सवलत देण्यात येणार आहे. एखादा विद्यार्थी क्रीडा, शास्त्रीय कला (गायन, वादन, नृत्य) चित्रकला व लोककलेतील सहभाग यापैकी एका पेक्षा जास्त क्षेत्रात प्राविण्य प्राप्त करत असला तरी, कोणत्याही एकाच क्षेत्रासाठीचे सवलतीचे अतिरिक्त गुण घेण्यासाठी अर्ज करू शकतो.

उपरोक्त शासन निर्णय विभागीय मंडळाचे संकेतस्थळावर उपलब्ध आहे. तरी संदर्भीय शासन निर्णयाचे अवलोकन करून त्यामध्ये सूचित केल्याप्रमाणे कार्यवाही करावी. तसेच निकाल विहीत कालावधीत लावणे मंडळास शक्य व्हावे, यासाठी **शाळांनी दिनांक १५ जानेवारी, २०२३ पर्यंत** प्रस्ताव मंडळाकडे सादर करावे.

सोबत परिशिष्ट 'अ' व 'ब'

(राजेंद्र अहिरे)
विभागीय सचिव,
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक
शिक्षण मंडळ,नाशिक विभागीय मंडळ,
नाशिक ४२२००३

प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाहीस्तव.–
१.जिल्हा क्रीडा अधिकारी,
जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय- नाशिक,धुळे,जळगाव,नंदुरबार
२.शिक्षणाधिकारी(माध्यमिक)- नाशिक,धुळे,जळगाव,नंदुरबार

# "परिशिष्ट अ -"

संस्थेचे नाव --------------------------------------------------------------------------- -:

पत्ता ----------------------------------------------------------------------------------- - :

सांस्कृतिक कार्य विभाग नोंदणी क्रमांक ------------------ दिनांक ------------------

## प्रमाणपत्र

अ) प्रमाणित करण्यात येते की, कुमार / कुमारी ---------------------------- हा /ही (शास्त्रीय कला प्रकारचे नाव) -------------------------------------- या कला प्रकारातील -----------------------परिक्षा --------गुणांसह (श्रेणी-------) उत्तीर्ण झाला / झाली आहे. सदर परिक्षा उत्तीर्ण होताना तो/ती ---------इयत्तेमध्ये शिक्षण घेत होता / होती.

ब) प्रमाणित करण्यात येते की, कुमार/कुमारी ---------------------------------- हा / ही मागील ------------ वर्षातील ---------------------- या लोककला प्रकारात एकूण -------------प्रयोगात सहभागी झाला / झाली आहे.

सदर विद्यार्थ्यास / विद्यार्थीनीस मार्च ---------- मधील माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इयत्ता १० वी ) परिक्षेत सवलतीचे वाढीव गुण देण्यास पात्र ठरविण्यात येत आहे.

स्थळ :

दिनांक :

अध्यक्ष / सचिव
संबंधित संस्थेचे नाव
(रबरी शिक्क्यासह)

टिप -"अ" किंवा "ब" यापैकी लागू नसेल ते खोडावे.

# "परिशिष्टब -"

दिनांक ---------------------

## प्रमाणपत्र

अ) प्रमाणित करण्यात येते की, कुमार / कुमारी ----------------------------- हा /ही इंटरमिजीट ड्राईंग ग्रेड परिक्षा सन -----------मध्ये ------------श्रेणीने उत्तीर्ण झाला / झाली आहे. सदर परिक्षा उत्तीर्ण होताना तो / ती ----------इयत्तेमध्ये शिक्षण घेत होता / होती.

ब) प्रमाणित करण्यात येते की, कुमार/कुमारी ----------------------------------- हा / ही इलिमेंटरी ड्राईंग ग्रेड परिक्षा सन ------------मध्ये उत्तीर्ण झाला / झाली आहे.

सदर विद्यार्थ्यास / विद्यार्थीनीस मार्च ---------- मधील माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इयत्ता १० वी ) परिक्षेत सवलतीचे वाढीव गुण देण्यास पात्र ठरविण्यात येत आहे.

स्थळ :

दिनांक :

संचालक,<br>कला संचालनालय, मुंबई<br>(रबरी शिक्क्यासह)